## ससेवाडीत खडी क्रेशरवर कारवाई ;नायब तहसीलदार प्रशांत जाधवरसह टीमची कामगिरी

# दोन कोटीचा मुद्देमाल जप्त












बीड (सरकार): तालुक्यातील मांजरसुंबा परिसरात असलेल्या ससेवाडी येथील खडी क्रेशवर बीड तहसील महसूल पथकाने कारवाई करत दोन कोटीचा मुद्देमाल जप्त केला आहे . सदरील कारवाई खडी क्रेशरची परवानगी नसल्याचे बोलले जात आहे. त्याच बरोबर दगड साठवण, गौण खणिज विभागाचा परवाना नाही. खडी क्रेशरला खरेदी विक्री करण्याचा परवाना नाही असे दिसून येत आहे. त्यामुळे सदरील चौकशीअंती पथकाने कारवाई करत दोन कोटीचा मुद्देमाल ताब्यात घेऊन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार प्रशांत जाधवर व त्यांच्या टीमने कौतुकास्पद कारवाई केल्याचे दिसून येत आहे.

बीड तालुक्यात अवैध वाळू, मुरूम माती उत्खनन मोठ्या प्रमाणात चालू आहे. यावर बीड तहसील महसूल विभाग वारंवारं कारवाई करून या अवैध धंद्यावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र खडी क्रेशर सारखी मोठी यंत्रणा विना परवाना बेकायदेशीररित्या चालवित असल्याची गंभीर बाब बीड महसूल विभागात अनेक ठिकाणी दिसून येत आहे. त्याचाच भाग म्हणून आज बीड तहसील महसूल पथक मांजरसुंबा बसस्थानक परिसरापासून काही अंतरावर असलेल्या ससेवाडीत खडी क्रेशरची चौकशी केली असता अनेक गंभीर त्रुटी दिसून आल्या. खडी क्रेशरला जिल्हा गौण खनिज विभागाची परवानगी नसल्याची प्राथमिक चर्चा समोर येत आहे. त्याच बरोबर खडी क्रेशरवर दगड बारीक करून खडी करण्याची परवानगी नाही त्याच बरोबर दगड आणून त्याची साठवण करणे यालाही परवाना नसल्याचे बोलले जात आहे. सदरील या चौकशीत महसूल पथकाला बऱ्याच काही गोष्टी दिसून आल्या आहेत. यावर कारवाई करत बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, तलाठी, मंडळाधिकारी यांच्या टीमने कारवाई करत वाहन, यंत्र यासह दोन कोटीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी बीड तहसील महसूल पथकाला शाबासकी द्यावी आणि अशा बीड तालुक्यात चाललेल्या खडी क्रेशरवर कारवाई करण्यासाठी महसूल विभागाला सूचना द्याव्यात. ससेवाडीच्या कारवाईत किती दंडात्मक कारवाई होते आणि गुन्हा दाखल होतो का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २७९ वा ■ गुरूवार १७ जुलै २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १८ जुलै २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 279 ■ Thursday 17 Jully 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027

## बीड तहसील कार्यालयाच्या पथकाने केलेली कारवाई,साकेत कंपनीने अनाधिकृत असल्याचा केला खुलासा

# विना परवाना राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील मुरूम मिश्रीत माती विकणाऱ्या साकेत कंपनीला;२ लाख ४१९५९ रूपये दंड

### २४ कि.मी.रस्त्याचे उत्खनन करून निघालेले मटेरीयल गेले कोठे?जिल्हाधिकारी साहेब,चौकशी करा

### मटेरियल टाकण्यासाठी कंपनी, राष्ट्रीय महामार्गाचे कार्यालय यांनी नगर पालिका अथवा ग्रामीण भागातील जागा मागीतली नाही साकेत कंपनीने मटेरीयलची विल्हेवाट कशी लावली, कोठे लावली, विकले का? विकले असेल तर जीएसटी भरली का? चौकशी करा

बीड (सरकार): बीड तालुक्यातील शिरापूर फाटा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि बार्शीनाका ते जरूड फाट्या दरम्यान सुरू असलेले राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू असताना दि.१२ जुलै रोजी बीड महसूल पथक गस्त घालत असताना २ टाटा कंपनीचे हायवा मुरूम मिश्रीत माती मुर्शदपूर फाटा येथे एका शेतकऱ्याला विक्री करण्यासाठी आणला होता. आणि सदरील चालकाने आपल्या जबाबात म्हटले आहे . सदरील पकडलेला मुद्देमाल अंदाजे ४० लाखापेक्षा जास्त असून सदरील साकेत कंपनी शासकीय काम असल्याचे सांगत राष्ट्रीय महामार्गाच्या कामाआड व्यापारीकरण म्हणजे राजरोजपणे माती मुरूमचा धंदा करीत आहे की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. बीड तहसील कार्यालयाने साकेत कंपनीला २ लाख ४१ हजार ९५९ रूपये ६८ पैसे असा दंडा ठोठावला आणि नोटीस देण्यात आली. मात्र यावर साकेत कंपनीने जागा मालकाची परवानगी घेऊन वेस्टज फेकत असताना मुर्शदपूर फाट्यावर तहसील कार्यालय बीड यांनी व त्यांच्या पथकाने अनाधिकृत गौण खनिज वाहतुक नसताना ताब्यात घेऊन कारवाई केली असा जाहीर खुलासा केला आहे. त्यामुळे प्रशासनाने केलेल्या कारवाईवर अनाधिकृत कारवाई केल्याचा ठपका साकेत इन्फ्रा प्रोजेक्ट लि.कंपनी कसे लावू शकते हे मात्र कळेनासे झाले आहे. त्यामुळे तालुका आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने राष्ट्रीय महामार्ग कार्यकारी अभियंता यांना पत्र पाठवून या संदर्भात खुलासा मागवावा अशी चर्चा होत आहे. तर राष्ट्रीय महामार्ग आपल्या देशाची



संपत्ती आहे आणि ती संपत्ती विनापरवाना शेतकऱ्याला विकत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदरील ही कारवाई राष्ट्रीय महामार्गाच्या सर्व कार्यालयांना सांगून करावी अशी चर्चा होत आहे.

बीड तालुक्यात राष्ट्रीय महामार्गाचे काम साकेत इन्फ्रा प्रोजेक्ट लि.करीत आहे. सदरील कंपनीला मोठ्या प्रमाणात वेळेत काम करून हा राष्ट्रीय महामार्ग खुला करायचा आहे त्या अनुषंगाने युध्द पातळीवर काम सुरू असून काम अंतिम टप्प्यात आले आहे. मात्र १२ जुलै रोजी बीड तहसील महसूल पथकाने संध्याकाळी अडीच वाजता गस्त घालत असताना साकेत इन्फ्रा प्रोजेक्ट कंपनीच्या दोन हायवा मुर्शदपूर फाट्यावर एका शेतकऱ्याला मुरूम मिश्रीत माती विकत असल्याचे महसूल पथकाच्या कारवाईत समोर आले. सदरील महसूल विभागाच्या पंचनाम्यात साकेत कंपनीच्या चालकाने आणि शेतकऱ्याने मुरूम विकत घेणे आणि देणे असल्याचे दंडात्मक कारवाईच्या पत्रात नमुद केले आहे. त्यामुळे साकेत कंपनी राष्ट्रीय महामार्गाच्या कामाच्या आड व्यापारीकरण म्हरजे राजरोजपणे माती मुरूम मिश्रीत विकण्याचा धंदा करीत आहे की काय? असा सवाल उपस्थित होत आहे. सदरील साकेत कंपनीला दोन लाख ४१९५९ रूपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. यावर कंपनीने खुलासा करत बीड तहसील कार्यालयाच्या पथकाची कारवाई अनाधिकृत असल्याचे खुलाशात म्हटले आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीची नोंद घेऊन साकेत कंपनीने २४ कि.मी.केलेल्या रस्त्याच्या कामाचे खोलीकरण केले आहे. यामधून निघालेले माती , मुरूम, डांबर कोठे ठेवले. सदरील ज्या ठिकाणी ठेवले आहे त्या न.प.चा परवाना घेतला आहे का? ग्रामीण भागात टाकला असेल तर ग्रा.पं.ने दिलेला परवाना आणि राष्ट्रीय महामार्ग कार्यालय बीड, लातूर, औरंगाबाद या तिन्ही कार्यालयाशी साकेत कंपनीने हे मटेरीयल टाकण्यासाठी मागीतलेली परवानगी, दिलेल्या गोष्टीची परवानगी या सर्वाची चौकशी करावी त्याचबरोबर साकेत कंपनीने केलेली गंभीर चूक ही अनाधिकृतपणे तहसील, महसूल प्रशासनावर ठपका ठेवणारी आहे. त्यामुळे या संदर्भात साकेत कंपनीला जिल्हा प्रशासनाने जाब विचारावा आणि नगर पालिका २४ कि.मी.अंतर असलेल्या रस्त्यामधील ग्रा.पं.ला विचारणा करून कारवाई करावी अशी चर्चा होत आहे.

### एसपी साहेब चकलांब्यात आश्चर्य झालं

## चक्क ! एक वाळूचा ट्रॅक्टर पकडायला अधिकाऱ्यासह सात कर्मचारी लागले

बीड (सरकार):चकलांब्यात पाहिलेल्या माहितीनुसार चकलांबा पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यासह सात कर्मचाऱ्यांनी एक ट्रॅक्टर पकडून मोठी कारवाई केल्याचे निदर्शनास आले आहे. याच परिसरातून जाणाऱ्या एलपी गाड्यावर कारवाई का झाली नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे.



गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याचे सपोनि संदीप पाटील यांना माहिती मिळाली की, राक्षसभूवन येथे नदीपात्रात वाळू उपसा करुन ट्रॅक्टर मध्ये भरली जात असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथक पाठवून छापा टाकला असता तिथे वाळू भरलेला ट्रॅक्टर मिळून आला. ट्रॅक्टर आणि वाळू असा एकूण ५ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. तर ट्रॅक्टर चालक जमीर आरिफ शेख रा. राक्षसभूवन यास ताब्यात घेऊन त्याच्या विरुद्ध संबंधित कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोलीस अंमलदार वंजारे, कैलास खटाने, प्रशांत घोंगडे, हनुमान इंगोले यांनी केली.

## पीक विमा घोटाळ्यात कोट्यवधींची लूट

### विनय आवटे अन् धनंजय मुंडेंवर सुरेश धसांचा हल्ला

मुंबई (सरकार): पंतप्रधान पीक विमा योजनेत कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात केला आहे. कृषी आयुक्तालयातील अधिकारी आणि विमा कंपन्यांनी संगनमताने शेतकऱ्यांचे नुकसान केल्याचा दावा करताना धस यांनी कृषी संचालक विनय आवटे यांच्यावर थेट हल्ला चढवला. तत्कालीन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरही नाव न घेता निशाणा साधत, या घोटाळ्याची सखोल चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.



आमदार सुरेश धस यांनी विधानसभेत सांगितले की, विनय आवटे हे गेल्या २० वर्षांपासून (२००४ ते २०२५) कृषी आयुक्तालयात कार्यरत असून, त्यांनी खासगी विमा कंपन्यांना लाभ मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांचा विमा रोखला. स्कायमेट यंत्रणेच्या माध्यमातून हप्ते घेतले जातात. विमा कंपन्यांनी शेअर बाजारात गुंतवणूक करून व्याज कमावले, पण शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळाला नाही, असा गंभीर आरोप धस यांनी केला.

सुरेश धस यांनी पुढे म्हटले की, वनखात्याच्या, गायरान जमिनी आणि अगदी मंदिर-मशिदींच्या जमिनींवरही खोटे शेतकरी दाखवून पीक विमा भरला गेला. बीडच्या ११ तालुक्यांसह वर्धा, नागपूर, अमरावती आणि जालना येथेही तत्कालीन कृषी मंत्र्यांच्या जवळच्या लोकांनी हे पैसे खाल्ले. धस यांनी थेट धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधत, एक रुपया पीक विमा योजना कोणाच्या काळात आली? कोण मंत्री होता, हे सर्वांना माहीत आहे, असंही म्हटले आहे. विनय आवटे हे कृषी आयुक्तालयातील मुख्य सांख्यिकी अधिकारी असून, गेल्या दोन दशकांपासून ते विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहेत. २०१६ पासून पंतप्रधान पीक विमा योजना खासगी कंपन्यांमार्फत राबवण्याचा निर्णय आवटे यांनी मंजूर केल्याचा आरोप आहे. आवटे यांनी विमा कंपन्यांना फायदा पोहोचवण्यासाठी यंत्रणा उभी केली आणि शेतकऱ्यांना विम्यापासून वंचित ठेवले. एक व्यक्ती २० वर्षे पीक विम्याचे वाटोळे कशी करू शकते? याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी धस यांनी केली. तसेच, कापूस बंडी आणि नॅनो युरिया घोटाळ्याच्या तक्रारीनंतरही आवटे यांना चौकशी प्रमुख बनवल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार,चौघांवर गुन्हा

बीड (सरकार): तालुक्यातील पिंपळनेर परिसरातील एका गावातील एका १७ वर्षीय मुलीवर चार युवकांनी वेळोवेळी वेगवेगळ्या ठिकाणी नेत लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या गंभीर प्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाण्यात चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून, या अत्याचाराने बीड जिल्हा हादरला आहे.

पीडितेच्या तक्रारीनुसार आरोपींनी ओळखीचा गैरफायदा घेत पीडितेवर बळजबरीने शारीरिक अत्याचार केला. या आरोपींमध्ये करण साळवे, वैभव यादव, लखन कांबळे (सर्व रा. पिंपळनेर) आणि दशरथ ढगे (रा. माजलगाव, सध्या पिंपळनेर) यांचा समावेश आहे. पीडितेला धमकावून गप्प ठेवले जात होते. फेब्रुवारी २०२५ पासून मासिक पाळी बंद झाल्याने पीडितेने चाचणी केली असता, तिला गर्भधारणा झाल्याचे समोर आले.बीडमधील एका खाजगी रुग्णालयात तपासणी केल्यानंतर गर्भाला पाच महिने झाल्याचे निष्पन्न झाले. आरोपींच्या नातेवाइकांनी गर्भपातासाठी दबाव आणल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी पिंपळनेर पोलिस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तपास साहाय्यक पोलिस निरीक्षक अतुलकुमार लांडगे करीत आहेत.

## संपादकीय

# प्रभावी बालसाहित्य आणि बालक

आज मी काही पुस्तकांसाठी क्रॉसवर्डमध्ये फेरी मारत होते. तिथे एक लहान मुलगी आपल्या पायांच्या अंगठ्यांच्या अगदी टोकावर उभी राहून पुस्तकांच्या वरच्या कप्प्यावरून एक पुस्तक काढण्याचा प्रयत्न करत होती. मी बाजूलाच होते, म्हणून लगेच तिला ते पुस्तक काढून दिलं, पण माझ्या हातातून ते पुस्तक खाली पडलं आणि मी त्या पुस्तकाचं शीर्षक वाचलं. ती लहान मुलगी, ... शीर्षक असलेलं पुस्तक(शीर्षक लिहिणं टाळलं आहे) घेऊन बिलिंग काऊंटरकडे पळत गेली. आठ नऊ वर्षांचं हे कोवळं वय आणि तिचे निरागस स्मितहास्य याचा मेळ त्या पुस्तकांशी जमणार होता का, असा प्रश्न मनात आला.

कारण या उत्तर बाल्यावस्थेतील मुलांचे तार्किक तर्क वाढणे, विज्ञान कल्पनेत जास्त रस वाढणे, स्पष्टीकरणात साधर्म्यांचा वापर करणे, समस्या सोडवण्याच्या कौशल्यांचा विकास करणे, आकलन शक्ती आणि निरीक्षण शक्ती उत्कट होणे ही वैशिष्ट्ये असतात.

स्मृती आणि कल्पनाशक्तीची स्वतःची शक्ती वापरण्याची क्षमता, या वैशिष्ट्यांचा अभ्यास करता या वयातील बालकांना तशा सकारात्मक संधी उपलब्ध करून देणं गरजेचं आहे हे आपल्या लक्षात येतेय. आकलनशक्ती उत्तम होत जाण्याच्या वयात आपण आयुष्य जगण्याची काही विशिष्ट तत्त्व असावी आणि ती कोणती असावी याबाबत बालकांचे मार्गदर्शन त्यांच्या आवडीच्या पद्धतीने करू शकतो.

मग माझी पण उत्सुकता वाढली ते पुस्तक चाळून बघण्याची. मी पण त्या वरच्या कप्प्यातून ते पुस्तक काढलं. पुस्तकाच्या मुखपृष्ठावरचे रक्ताचे डाग अगदी खरे वाटावे म्हणून भडक लाल रंग वापरला होता. त्यावर काळ्या रंगाच्या उभ्या पसरट मानवी आकृत्या होत्या. पुस्तक उघडून थोडी प्रस्तावना वाचली, तर लक्षात आलं एक मानसिक रोगी असलेल्या माणसाची ती कहाणी होती. ज्याने सात महिलांची अत्यंत क्रूरतेने कत्तल केली होती. हे पुस्तक या लहान बालिकेला का वाचावेसे वाटले असणार ?

डॉ. विजयाताई वाड यांनी लिहिलेली प्रायश्चित नावाची एक बालकथा आठवली. या कथेमध्ये गुरुनाथ नावाच्या एका बालकाची कथा आहे. त्यात किती सहजतेने चोरी करणं, हे किती चुकीचे आहे हे समजावून सांगितले आहे. या कथेत मोठ्यांनी समजूत काढल्यानंतर चुकीचे प्रायश्चित करून पुढे सकारात्मक मार्ग कसा निवडला हे सांगितलं आहे. ही कथा अत्यंत बालसुलभ भाषेत लिहिलेली आहे आणि सहजतेने जीवन शिक्षण देण्याचा उद्देश पूर्ण केला आहे. ती कथा बालकांनी वाचणं खूप आवश्यक आहे.

अशी पुस्तके या बालिकेच्या हातात असायला हवी, असं कळकळीने वाटून गेलं. पण खालच्या कप्प्यातील तिच्या वयासाठी उपलब्ध पुस्तकं तिने बघितलीदेखील नाही. वयाआधी उगाचच आलेलं हे मोठेपण कोणाची देणगी आहे? पालकांच्या अवास्तव अपेक्षादेखील याचं कारण असू शकते. कारण बिलिंग काऊंटरवर उभे असलेले तिचे बाबा अतिशय अभिमानाने सांगत होते की, माझी मुलगी खूप मॅच्युअर आहे. हे अकाली आलेलं प्रौढत्व बालपण होरपळून काढणारं असतं याचा विचार पालकांनी करायलाच हवा.

बालकांसाठी असलेलं साहित्य आणि बालकांनी निर्माण केलेलं बालसाहित्य याची अशी कितीशी जमापुंजी आता उपलब्ध आहे? अशावेळी मोजक्या दर्जेदार साहित्यिकांची नाव आपल्या समोर येतात. त्यात प्रामुख्याने डॉ. विजयाताई वाड यांचा उल्लेख करणं आवश्यक आहे. खूप मोठा बाल साहित्याचा ठेवा त्यांनी बालकांना सुपूर्द केला आहे. आज बालके किती प्रमाणात वाचन करतात हा प्रश्न तर महत्त्वाच आहेच, पण काय दर्जाचे साहित्य वाचतात हा गंभीर विषय आहे. बालकांनी त्यांच्यासाठी असलेलं साहित्य वाचावं यासाठी शिक्षक, पालक यांचा आग्रह असतो पण बालकांना ते वाचण्यात किती रुची असते हा अभ्यासाचा विषय आहे. आज आपल्याला फक्त बालकांसाठी लिहिण्यात आलेली गाणी, गोष्टीची पुस्तके फारशी बघायला मिळत नाही.

बालकांना वाचनाची त्यांच्यासाठी असलेल्या साहित्य वाचनाची गोडी निर्माण करणं अत्यावश्यक आहे. वाचन केल्याने बालकांचा दृष्टिकोन व्यापक होईल आणि लक्ष विचलित होणं कमी होऊन त्यांच्या बालमनाला पोषक आहार मिळेल. त्या-त्या वयाला त्या-त्या वयाचं कुतूहल असतं, ते शमवण्याचा प्रयत्न बालक आपआपल्या परीने करत असतात. त्यात त्यांना मदत करण्यास आम्ही सगळ्यांनी सोबत असायला हवं.

बालकांना आपली तत्त्व, आपले विचार याची बैठक बसवण्याच्या प्रक्रियेत काय योग्य-अयोग्य, विशिष्ट परिस्थितीत निर्णय घेण्यासाठी आवश्यक असणारी प्रगल्भता, ही एकाएकी येत नाही. त्या विशेष टप्प्यांची माहिती देण्याची जबाबदारी आपली आहे. उत्तर बाल्यावस्थेत आकलनशक्ती कमालीची वाढत असते. बालक त्यांनी कळलेली एखादी गोष्ट समजावून सांगण्यात खूप उत्सुक असतात. आकलन म्हणजे वाचलेला मजकूर समजून घेऊन, विश्लेषण करून त्यावर स्वतःच्या विचारांद्वारा इतरांना व स्वतःलाच सोप्या भाषेत समजावून देता येणे. याचा उपयोग करून अनेक छान विचारांनी प्रेरित करणारी पुस्तके बालकांना वाचायला देऊन त्याबाबत बालकाशी चर्चा करणं आणि त्यांची वाचनाबाबत आवड वाढवत जाणं आवश्यक आहे. मग माहिती केवळ उपदेशाने दिली गेली, तर बालक त्यांचा अवलंब करणार नाहीत, उलट ते वैतागतील. विविध प्रभावी माध्यमांचा उपयोग करावा लागणार त्यामध्ये बाल साहित्याची महत्त्वाची भूमिका आहे.

काही दिवसांपूर्वी मुंबईत पहिले राज्यस्तरीय बाल साहित्य संमेलन संपन्न झाले. त्यात सहभागी होण्याची संधी मला मिळाली. संमेलनात बालकाच्या प्रश्नांवर लिखाण करण्यासाठी आणि बालकांचे वेळोवेळी मार्गदर्शन करण्यासाठी मला सन्मानित करण्यात आलं. संमेलनात सामील काही बालकांनी लिहिलेल्या गोष्टी आणि कवितांची पुस्तके प्रकाशित झाली. बालकांनी स्वरचित कविता सादर केल्या. एका बालिकेने 'उंच आकाशी उडावे' अशा शीर्षकाची कविता प्रस्तुत केली. तिच्या बालभावना या कवितेतून व्यक्त झाल्या. तिची स्वप्न ती सुरेख शब्दात मांडू शकली, अशी संधी बालकांना उपलब्ध करून द्यायला हवी.

नित्य नियमाने अभ्यास व्यतिरिक्त दर्जेदार आणि बालकांसाठी उपलब्ध साहित्याचे वाचन करण्याची सवय बालकांमध्ये निर्माण होण्यास आपण प्रयत्न करूया. केवळ वाचन नव्हे तर बालकांना लिखाण करण्यास प्रोत्साहित करूया. व्यक्त होण्याचं हे एक प्रभावी माध्यम निश्चितच आहे. आपल्या सकारात्मक प्रयत्नांनी बालकांना योग्य दिशा मिळू शकेल, यात शंका नाहीच.

# शाब्बास शुभांशू!



ॲक्सिअम - ४' मोहिमेतलं अंतराळवीरांना परत पृथ्वीवर घेऊन येणारं 'ग्रेस यान' मंगळवारी दुपारी तीन वाजून एक मिनिटांनी प्रशांत महासागरातल्या अमेरिकेच्या सेंट दियागो किनाऱ्यालगत पाण्यात अलगद उतरलं, तेव्हा भारताने आपल्या अंतराळ विज्ञानाच्या प्रगतीतला खूप महत्त्वाचा टप्पा पार केला. 'ॲक्सिअम-४' अंतराळ मोहिमेत सहभागी झालेल्या ४ अंतराळवीरांपैकी केवळ एक, शुभांशू शुक्ला भारतीय असला, तरी भारताच्या आगामी 'गगनयान' या अत्यंत महत्त्वाकांक्षी, स्वदेशी मोहिमेची मुहूर्तमेढ शुभांशूच्या या यशस्वी अंतराळफेरीने रोवली, हे महत्त्वाचं आहे.

शुभांशूआधी भारताचा राकेश शर्मा हा अंतराळवीरही अंतराळात जाऊन सुखरूप परतला आहे. पण, त्याचा अंतराळ काळ कमी दिवसांचा होता आणि ती मोहीम मुख्यतः रशियाचीच होती. रशियाच्या 'सॅल्यूट - ७' या अंतराळ तळावर आठ दिवस राहून राकेश शर्मा परत आला, त्याला चाळीस वर्षे झाली. राकेश शर्माचा आदर्श समोर ठेवून सुधांशू शुक्ला अंतराळात गेला. आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्रात पाऊल ठेवणारा तो पहिला भारतीय ठरला. पृथ्वीच्या कक्षेबाहेर २० दिवस राहून सुखरूप परतणाराही तोच पहिला भारतीय ठरला. भारताच्यादृष्टीने अनेक महत्त्वाचे प्रयोग त्याने केले. त्या प्रयोगांनी संबंधित क्षेत्रात नवी दिशा सापडेल आणि समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी त्यातून जी रहस्य उघडतील, त्याचं प्राथमिक श्रेयही सुधांशूलाच द्यावं लागेल! शुभांशूचं सुरू असलेलं कौतुक, त्यासाठी त्याने घेतलेले कष्ट, जिद्द आपल्या उगवत्या पिढीपुढे ठेवली, तर त्यातून आणखी अनेक अंतराळवीर तयार होतील आणि ते भारताचे नाव अवघ्या विश्वात उंचावतील, यात शंका नाही.

'ॲक्सिअम - ४' ही मोहीम खरंतर गेल्या वर्षीच्या सुरुवातीलाच फत्ते व्हायची होती. पण, वातावरणाच्या अनेक अडचणी येत गेल्या. नवी तारीख जाहीर व्हायची, संपूर्ण तयारी केली जायची; पण हवामान आणि पृथ्वीच्या कक्षेच्या सीमारेषेवरील वातावरण दरवेळी काहीतरी नवी अडचण उभी करत असे. अखेरीस २६ जूनचा मुहूर्त कामी आला. त्या दिवशी अंतराळवीरांना घेऊन जाणाऱ्या यानासह अग्निबाणाने पृथ्वीची कक्षा ओलांडली. यानाने आपल्या १८ दिवसांच्या अंतराळ मुक्कामात पृथ्वीभोवती तब्बल २८८ प्रदक्षिणा घातल्या, ७६ लाख



मैलांचा प्रवास केला.

४३३ तासांच्या या अथक प्रवासादरम्यान सर्व शास्त्रज्ञांनी मिळून एकूण ६० संशोधनपर प्रयोग केले. शुभांशूने केलेल्या प्रयोगांमुळे भारतातल्या स्टेम सेलसंबंधातील संशोधनाला गती मिळेल, असा शास्त्रज्ञांचा विश्वास आहे. भारत आज अंतराळ संशोधनात अग्रेसर नाही, हे खरं. पण, त्या यादीत पहिल्या पाचांत आहे, हेही खरं. या क्षेत्रातील अतिप्रगत देशांच्या पंक्तीत मानाचं स्थान मिळवण्यासाठी भारताला अजून वेळ आहे. नियोजित 'गगनयान योजने'ने या क्षेत्रात आणखी काही पावलं पडतील, असं मानायला मात्र जागा आहे. 'ॲक्सिअम- ४' योजनेतला शुभांशूचा सहभाग, 'नासा'च्या अमेरिकेतल्या संशोधन केंद्रात तब्बल आठ महिने शिकण्याची मिळालेली संधी, अंतराळ प्रवासाचा आणि रहिवासाचा अनुभव - हे सगळंच 'गगनयान'साठी पायाभरणी ठरणार आहे. ही पायाभरणी अगदी भक्कम झाली,



असं 'इस्रो'तील तज्ज्ञांचं मत झालं आहे. ॲक्सिअम-४'मधील तीच भारताची मोठी कमाई आहे.

'गगनयान योजने'साठी संपूर्ण भारतीय बनावटीच्या एचएलव्हीएम-३ या अग्निबाणाची उभारणी जवळजवळ पूर्ण झाली आहे. गगनयान अंतराळ यानाची उभारणीही अंतिम टप्प्यात आहे. या मोहिमेसाठी ज्यांची निवड झाली आहे, त्या प्रशांत नायक, अजित कृष्णन् आणि अंगद प्रताप यांना भारत आणि रशियाच्या अंतराळ संशोधन संस्थांकडून प्रशिक्षण दिलं जाणार आहे. त्याबाबतचं वेळापत्रकही तयार आहे. २०२८ मध्ये नियोजनानुसार गगनयान मोहीम यशस्वी होईल, असा या क्षेत्रातल्या तमाम शास्त्रज्ञांचा दृढ विश्वास आहे. त्याला धोरणकर्त्यांनी बळ द्यायला हवं. विज्ञान तंत्रज्ञानातील संशोधनासाठी अमेरिका त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.५% निधी खर्च करते, तर चीन २.७% निधी खर्च करतो.

दक्षिण कोरियासारखा छोटा देश संशोधन, विकासावर त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्के निधी खर्च करतो. ब्राझीलही त्यासाठी १.२% निधी राखीव ठेवतो. भारताचा हा खर्च आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या अवघा ०.७% टक्के आहे. म्हणजे, भारताने आपल्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी किमान एक टक्क्यांचं महत्त्वाकांक्षी(!) उद्दिष्ट ठेवायला हवं, असं म्हणावं लागेल. आपल्या अर्थव्यवस्थेचा विस्तार, शिक्षण प्रसार, विविध क्षेत्रांत देशाची सुरू असलेली घोडदौड पाहता या बाबीवरही अत्यंत गांभीर्याने विचार व्हायला हवा.

सध्या दिसत असलेली प्रगती शाश्वत असावी, असं वाटत असेल, तर संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाच्या स्वदेशी प्रगतीसाठी निधीची चांगली तरतूद होणं गरजेचं आहे. संशोधन आणि नवीनतम कल्पनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच एक लाख कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्याची घोषणा केली आहे. त्या निधीचा योग्य आणि कार्यक्षम वापर झाला, तर भारताची तरुणाई त्यात आपलं भरीव योगदान देईल यात शंका नाही.

# पौष्टिकतेने समृद्ध असलेला ड्रायफ्रुट पिस्ताचे सेवन करा फायदे

लहान, हिरवा रंग असलेला 'पिस्ता' हा पौष्टिकतेचा खजिना आहे. प्रथिने, फायबर, निरोगी चरबी, कार्बोहायड्रेट्स, पोटॅशियम, फॉस्फरस, व्हिटॅमिन बी६, थायामिन, तांबे, मँगनीज यांनी समृद्ध असलेले हे नट आपल्या आरोग्यासाठी अनेक फायदे देते. त्याच्या सेवनाने अनेक आजार बरे होतात.चला जाणून घेऊ या पिस्ताचे फायदे.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर :** पिस्तामध्ये असलेले पोटॅशियम आणि मॅग्नेशियम आपल्या रक्तदाबावर नियंत्रण ठेवण्यास मदत करतात. त्याचे नियमित सेवन केल्याने आपल्या शरीरातील वाईट कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते आणि चांगल्या कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते. या कारणांमुळे आपले हृदय निरोगी राहते.

**रक्तातील साखर कमी करते :** कमी ग्लायसेमिक इंडेक्समुळे, पिस्त्याचे सेवन आपल्या रक्तातील साखरेची पातळी वाढण्यापासून रोखते. त्याच वेळी, त्यात असलेले प्रथिने आणि निरोगी चरबी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवतात. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी त्याचे सेवन खूप फायदेशीर ठरू शकते.

**त्वचेसाठी फायदेशीर :** पिस्ता खाल्ल्याने आपली त्वचा घट्ट राहते. त्यामुळे आपली खराब झालेली त्वचा दुरुस्त होण्यासही



मदत होते. पिस्त्याचे नियमित सेवन केल्याने चेहऱ्यावरील अकाली सुरकुत्या टाळता येतात.

**पचन चांगले करते :** पिस्ता हा आहारातील फायबरचा चांगला स्रोत मानला जातो. त्यात असलेल्या फायबरमुळे त्याचे सेवन आपले पचन सुधारण्यास मदत करते. ते बद्धकोष्ठतेला देखील प्रतिबंधित करते. अशा प्रकारे आपली पचनसंस्था निरोगी राहते.

# कोणालाही सांगू नका पैशाशी संबंधित या गोष्टी

आचार्य चाणक्य यांना भारताचे सर्वात महान विद्वान आणि अर्थशास्त्री मानले जाते. चाणक्य यांचे अनेक विचार आजही जीवनात लोकांना मार्गदर्शन करत असतात. चाणक्य नितीमध्ये अशा काही गोष्टी सांगित्या आहेत ज्या तुम्हाला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जातात. तसेच अनेक समस्याही तुम्ही चुटकीसरशी दूर करू शकता.

▶▶ चाणक्य नितीनुसार व्यक्तीने नेहमी समजून-उमजून बोलावे. चुकीच्या वेळेस बोललेले अनेक शब्द लोकांसाठी समस्या निर्माण करणारे ठरू शकतात.


▶▶ आपल्या योजना, कमतरता तसेच पैशांची माहिती कोणलाही देऊ नये. आपल्या आर्थिक योजना नेहमी गुप्त राखल्या पाहिजेत.

▶▶ चाणक्य नितीनुसार व्यक्तीचे सर्वात मोठे धन हे त्याचे ज्ञान असते. पैसे जरूर संपू शकतात मात्र ज्ञान कधीही संपत नाही. यामुळे नेहमी नवनवीन शिकण्याची सवय बनवा.

▶▶ ज्यांच्याकडे ज्ञान असते त्यांना कधीही भौतिक सुखाची कमतरता भास नाही. ते शिकत शिकत पुढे जातात आणि मोठे यश मिळवतात.

▶▶ राग, लोभीपणा आणि एखाद्या प्रगतीवर जळण्याची वृत्ती ही व्यक्तीला बर्बाद करण्यासाठी पुरेशी ठरते. याचे नियंत्रण मन आहे. मनावर नियंत्रण असेल तर सर्व काही शक्य आहे.

▶▶ असे म्हणतात की जशी संगत तसाच माणूस घडतो. ज्यांची आपल्याला संगत लाभते आपण तसेच होत जातो. यामुळे चांगल्या लोकांच्या संगतीत राहा. वाईट लोकांच्या संगतीत राहिल्याने नुकसानच होते.



# पावसाळ्यात दररोज सकाळी आल्याचा तुकडा खावा

आल्यामध्ये औषधी गुणधर्म भरपूर असतात. त्यात अँटी-बॅक्टेरियल, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात. त्यात जीवनसत्त्वे आणि खनिजे देखील मोठ्या प्रमाणात आढळतात. आल्यामध्ये मँगनीज, फॉस्फरस, मॅग्नेशियम, सोडियम आणि कॅल्शियमसह अनेक पोषक घटक असतात, जे शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात. आले खाल्ल्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि अनेक रोगांपासून बचाव होतो. आले सर्दी आणि हंगामी आजार बरे



करण्यास मदत करते. म्हणून तुम्ही पावसाळ्यात आल्याचे सेवन केले पाहिजे. पावसाळ्यात दररोज सकाळी आल्याचा तुकडा खाल्ल्याने अनेक आरोग्य समस्या दूर होऊ शकतात.

शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते : पावसाळ्यात शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. अशा परिस्थितीत, तुम्ही दररोज सकाळी आल्याचा तुकडा खावा. यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढेल. तसेच, सर्दी आणि हंगामी आजारांपासून संरक्षण मिळेल.

पचन सुधार : पावसाळ्यात पचनशक्ती कमकुवत होते. यामुळे गॅस, ॲसिडिटी, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या उद्भवतात. अशा परिस्थितीत तुम्ही दररोज सकाळी आल्याचा एक तुकडा खाऊ शकता. यामुळे पचनाशी संबंधित समस्या दूर होतील. पोटाची सूज देखील कमी होईल.

# स्वयंपाकघरातील या गोष्टी आजाराचे कारण असू शकतात

आपण आपल्या दैनंदिन जीवनात स्वयंपाकघरात नॉन-स्टिक पॅन आणि प्लास्टिकचा वापर करतो. याचा वापर केल्याने आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतात. आपल्या स्वयंपाकघरात अशा काही गोष्टी असतात ज्या आपण दररोज वापरतो, पण त्या आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतात. नॉन-स्टिक पॅन व्यतिरिक्त, स्वयंपाकघरातील काही इतर वस्तू आहेत ज्या दीर्घकाळ वापरल्यास आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात. स्वयंपाकघरातील नॉनस्टिक पॅन, प्लास्टिक कटिंग बोर्ड आणि प्लास्टिकची स्वयंपाकाची भांडी हे आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे तज्ञ सांगतात. हे आरोग्यासाठी हानिकारक कसे



आहे जाणून घेऊ या. नॉन-स्टिक पॅन जवळजवळ प्रत्येक घरात वापरले जातात,जेव्हा नॉन-स्टिक पॅन जास्त गरम केले जाते किंवा त्याचा थर निघत असतो तेव्हा ते PF-S सारखे विषारी रसायने सोडू शकते. ही रसायने शरीरात प्रवेश करू शकतात आणि हार्मोनल असंतुलन, यकृताचे नुकसान आणि अगदी कर्करोगासारख्या गंभीर समस्या निर्माण करू शकतात.**स्वयंपाकाची प्लास्टिकची भांडी :** आजकाल, चमचे, स्पॅटुला इत्यादी हलक्या आणि स्वस्त प्लास्टिकच्या स्वयंपाकघरातील भांड्यांचा वापर सर्रास केला जातो. तज्ञ सांगतात की, जेव्हा हे गरम भांड्यांमध्ये वापरले जातात तेव्हा प्लास्टिकचे विषारी पदार्थ अन्नात जाऊ शकतात. विशेषतः बीपीए आणि फॅथलेट्स सारखी रसायने हार्मोन्सवर परिणाम करतात आणि प्रजनन क्षमता आणि चयापचय आरोग्यावर वाईट परिणाम करू शकतात.


**प्लास्टिक चॉपिंग बोर्ड :** प्लास्टिक चॉपिंग बोर्ड स्वच्छ दिसू शकतात, परंतु ते लहान भेगा मध्ये बॅक्टेरिया आणि जंतूंचे घर बनतात. कालांतराने, या चॉपिंग बोर्डमध्ये सूक्ष्म क्रॅक तयार होतात, जिथे साफसफाई केल्यानंतरही बॅक्टेरिया लपून राहतात. जे अन्नातून विषबाधा होण्याचे प्रमुख कारण असू शकते. म्हणून चॉप करण्यासाठी नेहमी लाकडी चॉपिंग बोर्डचा वापर करावा. हे वेळोवेळी पूर्णपणे निर्जंतुक केले जाऊ शकतात.

काय करावे : नॉन-स्टिक भांड्यांऐवजी कास्ट आयर्न किंवा स्टेनलेस स्टीलची भांडी वापरा. प्लास्टिक कटिंग बोर्डऐवजी बांबू किंवा लाकडी बोर्ड वापरा. प्लास्टिकच्या भांड्यांऐवजी सिलिकॉन, स्टील किंवा लाकडी पर्याय निवडा.

# नित्यनेम म्हणजे काय?

## अध्यात्म: ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज

नित्यनेम म्हणजे काय ? नित्याचा जो नियम तो खरा नित्यनेम होय. नित्य कोण? जो कधीही बदलत नाही तो. याचा अर्थ, जो पूर्ण शाश्वत आहे तोच खरा नित्य होय. म्हणून नित्य म्हणजे भगवंत समजावा. त्याचा नियम करायचा म्हणजे काय करायचे? नियम करणे याचा अर्थ नियमन करणे, निग्रह करणे, वश करून घेणे, स्वाधीन ठेवणे हा होय. आपले मन भगवंताच्या स्वाधीन करणे, त्याच्या ठिकाणी ते नेहमी ठेवणे याचे नाव नित्यनियम होय. आजच्या आपल्या मनाच्या अवस्थेमध्ये ते सर्वस्वी भगवंताच्या स्वाधीन करता येत नाही आणि देह हा जड, अशाश्वत असल्यामुळे देहाने, नित्य आणि शाश्वत अशा भगवंताचा नियम घडणे शक्य नाही. म्हणून देहाने घेता येत असून देहाच्या पलीकडे असणारे आणि सूक्ष्म असल्यामुळे भगवंताशी शाश्वत संबंध असणारे, असे भगवंताचे नाम अखंड घेणे हा आपला खरा नित्यनियम आहे. इतर सर्व गोष्टी,



शास्त्राची बंधने, पोथी वगैरे वाचणे, स्नानसंध्यादि नित्यकर्मे वगैरे पाळावी पण त्याचा हट्ट वा आग्रह असू नये. कोणत्याही अवस्थेमध्ये भगवंताचे नाम मात्र सोडू नये. एवढाच हट्ट क्षम्य आहे.

शुद्ध भावनेने नाम घेतले की भगवंत दर्शन देतो. शुद्ध भावनेचे फळ फार मोठे आहे. पुष्कळ वेळा गरीब आणि अशिक्षित लोकच या बाबतीत श्रेष्ठ असतात. आपण नाम घेत जावे. नामाने भावना शुद्ध होत जाते. खरे म्हणजे, मनुष्याला जिवंत राहण्यासाठी हवेची जितकी गरज आहे तितकीच, किंबहुना त्याहूनही जास्त जरुरी, परमार्थामध्ये भगवंताच्या नामाची आहे. भगवंताच्या नामाशिवाय न राहण्याचा संकल्प प्रत्येक माणसाने केला पाहिजे. भगवंत हट्टाने किंवा उगीच केलेल्या कष्टाने साध्य होत नाही. तो एका प्रेमाने वश होतो. प्रेमामध्ये हट्ट आणि कष्ट झाले तर शोभतात आणि हिताचे होतात. आपण भक्तांचे प्रेम न पाहता त्यांचा हट्ट आणि कष्ट तेवढे बघतो. जो मनुष्य साडेतीन कोटी रामनामाचा जप करील त्याला भगवंताच्या प्रेमाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही. शंका या फार चिवट असतात, त्या मरता मरत नाहीत. शिवाय, काही शंका आचरणाने आणि अनुभवानेच नाहीशा होतात. म्हणून, मनात शंका असल्या तरी नाम सोडू नये. सतत नाम घेत गेल्याने मन स्वच्छ होत जाते आणि सर्व शंका आपोआप विरून जातात. लंकेमध्ये रावणाच्या बंदिवासात अशोकवनात सीता असताना, तिच्या सान्निध्याच्या प्रभावामुळे तिथली झाडे, पक्षी, दगड या सर्वांना रामनामाचे प्रेम लागले होते, असे वर्णन आहे. रामनामाचे प्रेम आणि भगवंताचे प्रेम ही दोन्ही एकच आहेत. नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे ह्यातच जीवनाचे सर्वस्व आहे.

■ गुरुवार दिनांक १७ जुलै २०२५

बीड सरकार

पान 3

# विशेष वृत्त

## शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनींचा सत्कार

**बीड :** तालुक्यातील गुंधा वडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थिनी गीता भाऊसाहेब डोळस हिने इयत्ता ५ वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ग्रामीण मधून बीड जिल्ह्यातून दहावा क्रमांक मिळवला. याच शाळेतील अनिता अंगद मोरे हिने जिल्ह्यातून १८०वा क्रमांक मिळवला आहे. याबद्दल दोन्ही विद्यार्थिनींचा गुंधा गावचे सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, ग्रामस्थ, पालक तथा मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. वर्गशिक्षक प्रमोद कुलकर्णी यांच्या प्रेरणेने व त्यांच्या मार्गदर्शनाने आम्ही हे यश संपादन करू शकलो असे गीता व अनिता यांनी सांगितले. ग्रामीण भागात राहून खूप अडचणींवर मात करून त्यांनी हे यश संपादन केल्याने त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन इतरही मुलांनी असाच प्रयत्न करावा, असे सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी गुंधा गावचे सरपंच नंदकिशोर मोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दीपक मोरे, ग्रामपंचायत सदस्य सुदर्शन मोरे, शाळेचे मुख्याध्यापक तिरगुळ व शिक्षक कुलकर्णी, झांबरे, भुसारे, कुलकर्णी, यादव यांच्यासह पालक उपस्थित होते.

## चिंचोली माळी येथे सप्ताहास प्रारंभ

**केज :** चिंचोलीमाळी येथे श्री. संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्री. संत सावता महाराज चरित्र ग्रंथ वाचन सोहळ्यास बुधवारी (दि.१६) प्रारंभ झाला. केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे गेल्या ११ वर्षापासून श्री. संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्री. संत सावता महाराज चरित्र ग्रंथ वाचन सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. बुधवारी सकाळी भगवान महाराज पुरी यांच्या हस्ते कलश पुजन करून ग्रंथ पुजन, टाळ, विना, मृदंग पुजन करून सुरुवात करण्यात आली. यावेळी भाजपचे जेष्ठ नेते सुनिल गलांडे, माजी उपसरपंच जितेंद्र देशमुख, चेअरमन अरुण काळे, राम मेजर राऊत, राम नखाते यांची प्रमुख उपस्थिती होती. सोहळ्यात गुरुवारी रात्री महादेव महाराज राऊत यांचे, शुक्रवारी ज्ञानेश्वर माऊली महाराज यांचे, शनिवारी प्रकाश महाराज साठे यांचे, रविवारी सुमंत महाराज डाके यांचे, सोमवारी प्रणिता महाराज गवारे यांचे, मंगळवारी अक्रूर महाराज साखरे यांचे यांचे कीर्तन होणार आहे. बुधवारी सकाळी १० वाजता महंत भगवान महाराज पुरी यांचे काल्याचे किर्तन होणार असून सुनिल प्रभू राऊत यांच्यातर्फे भाविकांना महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. दरम्यान, रविवारी रात्री ९.३० वाजता गोविंद महाराज गायकवाड यांचा सोंगी भारुडाचा कार्यक्रम होणार होईल.

## ‘संस्कार’मध्ये विद्यार्थिनींना मार्गदर्शन

**बीडः** येथील संस्कार विद्यालयात पाचवी ते सातवी विभागामध्ये विद्यार्थ्यांसाठी सक्षम तू या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींना मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र राज्यात सक्षम तू हा उपक्रम राबवण्यात येत आहे. यानिमित्ताने संस्कार विद्यालयात ॲड. प्रज्ञा खोसरे यांनी सक्षम तू या उपक्रमात अंतर्गत विद्यार्थिनींशी संवाद साधताना आपण सगळ्या परिस्थितीत सक्षम असले पाहिजे साधी रहाणी आणि उच्च विचार ठेवत आपल्या आई-वडिलांचा गुरुजनांचा आदर आपण केला पाहिजे तसेच आपल्या अधिकारांचा योग्य वापर करावा असे प्रतिपादन केले. दामिनी पथकाच्या मीरा रेडेकर यांनी मुलींना स्वतः चे संरक्षण कसे करावे या संदर्भात मार्गदर्शन केले. आणि सक्षम राहण्यास मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी राज्य महिला आयोगाच्या सदस्या ॲड. प्रज्ञा खोसरे यांनी संविधान उद्देशिका प्रत फोटोफ्रेम करुन भेट स्वरुपात शाळेच्या मुख्याध्यापिका शोभाताई कुलकर्णी यांना दिली. याप्रसंगी व्यासपीठावर शाळेच्या मुख्याध्यापिका शोभाताई कुलकर्णी आदींसह विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती आरक्षणाबाबत सीईओंचे आदेश

**बीड :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या अध्यक्षतेखाली दिव्यांग कर्मचारी संघटनेच्या निवेदनानंतर झालेल्या बैठकीत सर्व संवर्गातील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीतील आरक्षण विनाविलंब पूर्ण करण्याचे सक्त आदेश सर्व विभाग प्रमुखांना देण्यात आले. बैठकीत दिव्यांग कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक वागणूक, अडथळाविरहित सुविधा, तक्रारींचे तात्काळ निराकरण आदी मुद्यांवर सखोल चर्चा झाली. या बैठकीस संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक आठवले, तसेच राजेंद्र लाड, आजिनाथ हाडूळे, शामसुंदर दासरे, बाळासाहेब सोनसळे, अतुल मिटकरी आदी पदाधिकारी उपस्थित होते. सीईओ जितीन रहमान यांना संविधान प्रत देऊन सन्मानित करण्यात आले. बैठकीनंतर ही माहिती अधिकृत प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली.

# ध्येय साध्य करण्यासाठी स्वप्ने मोठी बघा

## डॉ. सुमित नाहरः सिंदफणाचा २३ वा वर्धापन दिन उत्साहात




**माजलगाव (प्रतिनिधी):-** ध्येय साध्य करण्यासाठी स्वप्ने मोठी बघा असे प्रेरणादायी मत डॉ. सुमित नाहर यांनी व्यक्त केले. ते माजलगाव येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या २३ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. सकाळी शाळेच्या प्रांगणात झालेल्या या भव्य समारंभाला शिक्षकवर्ग, पालक व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही सिंदफणा पब्लिक स्कूलने आपल्या माजी विद्यार्थ्यास प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करून वर्धापन दिन साजरा केला. मुख्य अतिथी डॉ.सुमित नाहर यांनी शाळेच्या गेल्या २३ वर्षांच्या प्रवासाची दखल घेत शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उच्च ध्येय ठेवून त्यासाठी निरंतर प्रयत्न करण्याचा संदेश दिला आणि मोठी स्वप्ने पाहण्याचे महत्त्व सांगितले. या वेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन केले होते. भारतीय शास्त्रीय नृत्य, गायन, वाद्य वादन तसेच देशभक्तिपर कवितांच्या सादरीकरणाने उपस्थितांचे मन मोहन टाकले. विशेषतः विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या महत्त्वावर आधारित नाटिकेचे प्रभावी सादरीकरण केले, ज्याने सर्वांची मनापासून प्रशंसा मिळवली. या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या बहुमुखी प्रतिभेचे दर्शन झाले. शाळेचे प्रा. अन्वर शेख यांनी या शैक्षणिक वर्षातील उपलब्धींची विस्तृत माहिती दिली. प्रा. शेख यांनी भविष्यातील योजनांची माहिती देत सांगितले की, शाळेत नव्या शैक्षणिक सुविधा व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाचा दर्जा वाढवण्यात येईल. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगली शिक्षणसुविधा मिळेल आणि त्यांचा सर्वांगीण विकास होईल. सर्व उपस्थितांनी शाळेच्या भविष्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आणि या उत्सवाचा आनंद घेतला. यावेळी शाळेमध्ये दहा वर्ष पूर्ण केलेल्या विठ्ठल आगे, जयश्री भगस आणि किष्किंधा गायकवाड या कर्मचाऱ्यांचा बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या समन्वयक नीला देशमुख, उपप्रा. राहुल कदम, विद्यार्थी प्रतिनिधी आदिल शहा, सानिका सोळंके, सर्व शिक्षक, पालक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकनेते कारखाना परिसरात वृक्षारोपण



**माजलगाव (प्रतिनिधी):** लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर तेलगाव ता.धारुर जि.बीड येथे दि.१६ जुलै रोजी केंद्र शासनाचे 'एक पेड मॉ के नाम' मोहिमे अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय सहकार दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले.

कारखान्याचे जेष्ठ संचालक आ. प्रकाश सोळंके व कारखान्याचे मार्गदर्शक धैर्यशील सोळंके यांचे अध्यक्षतेखाली व चेअरमन विरेंद्र सोळंके, व्हाईस चेअरमन जयसिंग सोळंके व कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर यांचे प्रमुख उपस्थितीत, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, देशमुख व्ही.ए. यांचे हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. जार्गातक पर्यावरणाचा समतोल तसेच भावी पिढीच्या उज्वल भवितव्यासाठी सामाजिक बांधिलकी तसेच केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रमा अंतर्गत कारखाना दरवर्षी कारखाना परिसरात वृक्ष लागवड करीत असुन आतापर्यंत कारखाना परिसरात एकुण ११७०९ झाडे लावणेत आलेली असुन ती चांगल्या पध्दतीने जोपसलेली आहेत. या कार्यक्रमास कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी. बडगुजर, जनरल मॅनेजर (आसवणी), डी. एम.वरे, जनरल मॅनेजर (इंजि.), एस.एस. शिनगारे, मुख्य शेतकी अधिकारी आर. आर. देशमुख, सचिव सुरेश लगड, एस.बी.घाडगे, बी. एस. झोडगे, जुनेद बागवान, डी.डी. पोपळे, जे. एन. पाटील, डी.बी.मोरे, कारखान्यातील सर्व कर्मचारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## पीकविम्यासह ठिबक, तुषार सिंचन योजनांचा लाभ मिळण्यास अडथळा

**बीड (प्रतिनिधी):- तालुक्यातील** अनेक शेतकऱ्यांना फार्मर आयडी नोंदणी करताना तांत्रिक अडचणी येत असून यामुळे पीकविमा, ठिबक, तुषार सिंचन यांसारख्या योजनांचा लाभ मिळण्यात अडथळा निर्माण होत आहे. या समस्येकडे लक्ष वेधून, संचालक धनंजय गुंदेकर यांनी बीडचे तहसीलदार शेळके यांना निवेदन देऊन तांत्रिक समस्या तात्काळ सोडवण्याची मागणी केली आहे. गुंदेकर यांनी सांगितले की, फार्मर आयडी नोंदणी व्यवस्थित न झाल्यामुळे शेतकऱ्यांना अनुदान व सवलती मिळत नाहीत, जे शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी वाढवणारे आहे.

## विकसित महाराष्ट्र सर्वेक्षणात सहभागी व्हावे-जिल्हाधिकारी



**बीड (प्रतिनिधी):** विकसित महाराष्ट्र २०४७ चे नागरिक सर्वेक्षण १७ जुलै, पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या सर्वेक्षणात सामान्य नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे, जेणेकरून त्यांच्या समस्या, शासनाकडून असलेल्या अपेक्षा याबाबत माहिती घेऊन त्यानुसार रोडमॅप तयार करणे शक्य होणार आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रथम सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी स्वतःया लिंकवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन क्लिक करुन सर्वेक्षणात सहभागी व्हावे. आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना देखील सर्वेक्षणात सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. तनंतर आपल्या अधिनस्त किंवा संपर्कात येणाऱ्या सर्व नागरिकांना सर्वेक्षणात सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहित करावे. आपल्या गावातील, शहरातील तसेच नातेवाईक, मित्रांच्या व्हाट्सएप ग्रुपवरुन याबाबत जागृती करावी, जेणेकरुन बीड जिल्ह्यातून जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग नोंदविणे शक्य होणार असल्याचेही जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी शासकीय यंत्रणाना सांगितले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ६ मे २०२५ ते २ ऑक्टोबर या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये विकसित महाराष्ट्र २०४७ करिता व्हिजन डॉक्यूमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

## ट्रिगर रद्द करून शेतकऱ्यांची फसवणूक सुरु - जे.डी.शाह

**गेवराई (प्रतिनिधी):-** राज्य सरकारने एक रुपयातील पिकविमा योजना बंद करत, त्याऐवजी केवळ पीक कापणी प्रयोगावर आधारित सुधारित योजना सुरू केली आहे. या नव्या योजनेत 'ट्रिगर' रद्द केल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची शक्यता कमी झाली असून, ही योजना शेतकऱ्यांसाठी फसवी आणि घातक ठरणारी आहे, अशी तीव्र टीका समाजसेवक जे. डी. शाह यांनी केली आहे.

शाह यांनी यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे एक निवेदन पाठवून शेतकऱ्यांना संकट काळात दिलासा देणारी जुनी ट्रिगर प्रणाली पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे. पूर्वीच्या योजनेत पावसातील खंड, अतिवृष्टी, वादळ, काढणी पश्चात नुकसान यासारख्या टप्प्यांवर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत असे. या ट्रिगरमुळे शेतीच्या कोणत्याही अवस्थेत नुकसान झाले तरी विमा कंपनीकडून परतावा मिळण्याची हमी होती, त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरत होती. नव्या योजनेत केवळ महसूल मंडळ निहाय पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई दिली जाणार आहे. मात्र, एका महसूल मंडळात १०-१२ गावे असतात. यातील २-३ गावांत अतिवृष्टी झाल्यास इतर गावांतील चांगल्या उत्पादनामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई नाकारली जाऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होण्याची शक्यता शाह यांनी व्यक्त केली. याशिवाय, ट्रिगर हटवून विम्याचा हप्ता मात्र मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आला आहे, ही शेतकऱ्यांची दुहेरी फसवणूक असल्याची टीकाही त्यांनी केली. विमा हप्ता वाढवला तरी चालेल, पण शेतकऱ्यांना दिलासा देणारे ट्रिगर रद्द करू नयेत, अशी मागणी शाह यांनी निवेदनातून केली आहे. आपत्तीच्या काळात ट्रिगर हे शेतकऱ्यांसाठी आधारवड ठरत होते, त्यामुळे ही यंत्रणा कायम ठेवणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## गेवराईमध्ये फुले दांपत्याच्या अर्धाकृती पुतळ्यांची मागणी



**गेवराई (प्रतिनिधी):-** क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे अर्धाकृती पुतळे उभारून भव्य-दिव्य स्मारक उभारावे, अशी मागणी गेवराई शहरासह तालुक्यातील माळी समाजबांधव, फुले प्रेमी नागरिकांनी नगरपरिषदेकडे केली आहे.

नगरपरिषद कार्यालयासमोरील जागेत अथवा योग्य ठिकाणी जागा आरक्षित करून फुले दांपत्याचा सन्मान करण्यात यावा, अशी मागणी होत आहे. महात्मा फुले समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष बापू गाडेकर आणि सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी यांनी केली मागणी केली आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यांची स्थापना करणे योग्य असून, त्यांचे कार्य आणि योगदान मोठे आहे. त्यांनी लोकांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच स्त्री शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे समाजात समानता आणि न्यायाचे मूल्य वृद्धिंगत झाले. त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ अर्धाकृती पुतळा उभारणे महत्वाचे आहे. महाराष्ट्रातील फुले दांपत्य हे थोर समाजसुधारक होते. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी आणि जातिभेद दूर करण्यासाठी मोठे कार्य केले. गेवराई शहरात फुले दांपत्याचा पुतळा उभारणे म्हणजे शहराच्या वैभवात भर टाकण्यासारखे आहे. स्त्री शिक्षण, शेतकरी हक्क व सामाजिक समतेसाठी आयुष्य वाहून घेणाऱ्या फुले दांपत्याच्या स्मारकाची आजतागायत लोकप्रतिनिधींना अथवा इतर कोणालाही साधी कल्पनाही सुचली नाही. त्यामुळे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा अर्धाकृती पुतळा नगरपरिषदेकडून जागा उपलब्ध करून उभारण्यात यावा, अशी मागणी समस्त माळी समाजासह फुले प्रेमी नागरिकांकडून होत आहे.

## जनसुरक्षा कायद्याविरोधात विधिज्ञ एकवटले

### विधेयक रद्द करण्याची निवेदनाव्दारे मागणी

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** महाराष्ट्र सरकारने जनसुरक्षा विधेयक विधानसभेत आणि विधानपरिषदेत मंजूर केले मात्र या विधेयकामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येणार आहे. हे विधेयक लोकशाहीला धोका निर्माण करणारे, समाजातील कष्टकरी, शोषित, वंचितांचा न्याय मागणार आवाज दाबविणारा हा कायदा रद्द करण्यात यावा या मागणीसाठी अंबाजोगाई येथील विधिज्ञ बुधवारी (दि.१६) एकवटले. अंबाजोगाई येथे विधिज्ञांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले.


जनसुरक्षा हे विधेयक सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते, संविधान रक्षणासाठी लढणारे मानवाधिकार कार्यकर्ते, पत्रकार व सामाजिक संघटनांचे आंदोलन दडपण्यासाठी मंजूर करण्यात आल्या आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नक्षलवाद आणि दहशतवाद संपल्याचे सरकारच म्हणत असताना, जनसुरक्षा कायदा कोणासाठी ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. विधेयकात व्यक्ती वा संघटनांनी शाब्दिक किंवा कृतीद्वारे सार्वजनिक सुरक्षा, शांतता, सौहार्द धोक्यात आणणे, प्रशासनाच्या कामात अडथळा आणणे, हिंसाचाराला उत्तेजन देणे, जनतेत भीती निर्माण करणे, कायद्याचे उल्लंघन करण्यास प्रवृत्त करणे, तसेच त्यासाठी निधी वा सामग्री जमा करणे यांचा उल्लेख आहे. मात्र, या तरतुदींचा सत्ताधारी पक्षांकडून गैरवापर होण्याची शक्यता असल्याने, हे विधेयक जनसुरक्षेचे नसून सर्व सामान्य नागरिकांची मुस्कटदाबी करणारे विधेयक असून हे विधेयक तात्काळ रद्द करावा अशी मागणी अंबाजोगाई, कायदेतज्ञ, वकीलाकडून करण्यात आली आहे. अंबाजोगाई येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात बुधवारी या बाबत निवेदन देताना कायदेतज्ञ, वकील मंडळी उपस्थित होते.



## कपिलधारमध्ये संत गजानन महाराज पालखीचे जल्लोषात स्वागत

### टाळ, मृदंगाचा गजर अन् जय गजानन जयघोषाने वातावरण भक्तीमय





**बीड (प्रतिनिधी):** संतांची पालखी म्हणजे चालते बोलते देवत्वच. अशीच शिस्तप्रिय म्हणून ओळखली जाणारी संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांच्या पालखीचे बुधवारी (दि. १६ जुलै) सकाळी ११ वाजता श्री क्षेत्र कपिलधार येथे आगमन झाले. फुलांची उधळण व आतषबाजी करुन पालखीचे श्री क्षेत्र कपिलाधार देवस्थान पंच कमिटीच्या वतीने स्वागत करण्यात आले. श्रींच्या पालखीचे आगमन झाल्याने कपिलधारमध्ये अवघा रंग एक झाला असे भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. या भक्तीरसात प्रत्येकजण न्हाऊन निघाला. आषाढीनंतर पंढरपूरहून परतीच्या मार्गावर असलेल्या संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज पालखीचे मंगळवारी (दि. १५) बीड जिल्ह्यात आगमन झाले. चौसाळा येथील मुक्कामानंतर बुधवारी (दि. १६) श्रींची पालखी मांजरसुंबा मार्गे नागमोडी घाटातून गण गण गणात बोतेचा गजर करत श्रीक्षेत्र कपिलधार येथे दाखल झाली. यावेळी आतषबाजी करून पालखीचे स्वागत करण्यात आले. मंदिर परिसरात रांगोळी काढण्यात आली होती. टाळ, मृदंग आणि 'गजानन महाराज की जय' च्या गजराने सगळीकडे आनंदाचे व भक्तिभावाचे रंग उधळले गेले. मंदिर परिसरात उभारलेल्या मंडपात श्रींची पालखी विसावली. यावेळी श्रीक्षेत्र कपिलधार देवस्थान पंचकमिटीच्या वतीने विणा पूजन झाल्यानंतर श्रीच्या पालखीची महाआरती करण्यात आली. पालखीच्या सान्निध्यात फुलांची उधळण करत भक्तांनी आपली निष्ठा श्रींच्या चरणी अर्पण केली. वारकऱ्यांसाठी डाळ-बाटीचा गरमागरम महाप्रसाद देखील देवस्थानच्या वतीने वाटप करण्यात आला. पालखीच्या स्वागतासाठी स्वयंसेवक कार्यरत होते. कपिलधार येथे विसावल्यानंतर दुपारी १ वाजता पालखीने बीडकडे प्रस्थान केले. दरम्यान आज पाली येथे पालखी मुक्कामासाठी थांबणार असून आज गुरुवारी (दि. १७) सकाळी ९ वाजता पालखीचे बीडमध्ये आगमन होणार आहे. यंदा श्रींची पालखीचा मुक्काम श्री खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात राहणार आहे.

# बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके शेतकऱ्याच्या बांधावर

## पोथरा गावात चालवून पाहिले डुबे( कोळपणी यंत्र )

बीड (सरकार): तालुक्यात नेकनूर मंडळात केजच्या हद्दीला लागून पोथरा हे गाव आहे . या गावी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , नेकनूरचे मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे , पोथऱ्याचे तलाठी अक्षय चव्हाण , तलाठी सर्वेश कांबळे , तलाठी प्रशांत नलावडे यांनी भेट दिली.यावेळी मधुकर साहेबराव दराडे , सुरेश हावळे उपस्थित होते .

शेतकरी कोळपणी करत असल्याचे बघून तहसीलदार थांबले. मलाही कोळपणी करण्याचा अनुभव घेऊ द्या,असे त्यांनी बोलून दाखविले.त्या ठिकाणी कोळपणी करण्याची पद्धत समजून घेतली.स्वतः कोळपणी करण्याचा अनुभव घेतला . शेतकरी दराडे यांच्याशी गप्पा मारताना त्यांनी माहिती घेतली. यावेळी दराडे यांनी माहिती दिली की त्यांच्या शेतात बहुतांश वेळा सोयाबीन हेच पीक घेतल्या जाते . जमीन सुपीक असली तरी बारमाही पाण्याची व्यवस्था नसल्याने त्यांना खरिपात हेच पीक परवडते . यापूर्वी ते कपाशीचे पीक घेत असत . तथापि कपाशीच्या पिकावर असणाऱ्या रोगराई , त्यास लागणारा खर्च इत्यादी विचारात घेता त्यांना सोयाबीन पीक हे परवडत आहे .



शासनाच्या शेतकऱ्यांसाठी अनेक योजना असतात . कृषी विभाग , महसूल विभागामार्फत या योजनांची अंमलबजावणी होत असते . शेतकऱ्यांचे काय प्रश्न आहेत याबद्दलची माहिती प्रत्यक्ष भेटी दिल्याशिवाय कळत नाही . त्या अनुषंगाने तहसीलदारांची प्रत्यक्ष शेतावर भेट महत्त्वाची ठरते.बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे प्रत्येक तालुक्यास भेट देऊन सर्वसामान्य जनता, नागरिक यांचे प्रश्न समजावून घेत आहेत . बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी आल्यापासून अनेक उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे . शेतकऱ्यांच्या अडचणी असल्यास ते व्यवस्थितरित्या समजून सांगतात . संबंधित उपविभागीय अधिकारी , तहसीलदार यांच्याशी सरळ संपर्क साधून नागरिकांची कामे सोप्या पद्धतीने कशी होतील याची दक्षता बाळगतात.बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या शेतकऱ्यांप्रती अत्यंत कनवाळू आहेत . सर्वसामान्य शेतकऱ्यांची कामे लवकर झाली पाहिजे, फेरफार लवकर झाले पाहिजे , फार्मर आयडी लवकर निघाले पाहिजे यासाठी त्या वेळोवेळी बीड , गेवराई , शिरूर कासारचे तहसीलदार , नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी , तलाठी यांचा पाठपुरावा करत असतात .

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाच्या योजना सुरू केल्या आहेत . विशेषता बारा फुटाचा रस्ता , सातबारा वरील अनावश्यक नोंदी कमी करण्यासाठी जिवंत सातबारा मोहीम राबविणे इत्यादी अनेक शेतकरी हिताचे निर्णय त्यांनी घेतले आहेत . त्यांचे निर्णय स्थानिक पातळी पर्यंत पोहोचले किंवा नाही याची खात्री करण्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके झटत असल्याचे दिसून येते . बीड तालुक्यातील पीक पेरणीचा विचार केला असता बाजरी ९८५६ हेक्टरवर , मका २१५४ हेक्टर , तूर ५४०८ हेक्टर , मूग ३२४५ हेक्टर , उडीद ३४१५ हेक्टर , भुईमूग ४० हेक्टर , तीळ १५ हेक्टर , सोयाबीन ४६,२४१ हेक्टरवर , कापूस ५१,८२४ हेक्टरवर अशाप्रकारे १, २२, २५३ हेक्टरवर पेरणी झाल्याचे दिसते . बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत . या सर्व तालुक्यांचा विचार केला असता सरासरी ८७% हेक्टरवर खरिपाची पेरणी झाल्याचे समजते . यावर्षी मे महिन्याच्या शेवटी शेवटी चांगल्या प्रकारे पाऊस झाला असला तरी जून महिन्यातील पाऊसमान हे सलग दिसत नाही . अधून मधून पावसाच्या सरी येतात . त्यामुळे पिके तग धरून आहेत . तथापि मोठ्या पावसाची प्रतीक्षा दिसून येते . आजच्या तहसीलदारांच्या भेटीमुळे पोथरा येथील शेतकरी आनंदी झाल्याचे दिसून आले . माझ्या शेतात तहसीलदार यांनी स्वतः येऊन कोळपणी केली हे माझे भाग्य आहे, असे दराडे यांनी नमूद केले . बीड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी तहसीलदार शेळके यांच्याप्रमाणे क्षेत्रिय भेटी दिल्या , शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या तर निश्चितच प्रशासनाबद्दलची नागरिकांची भावना सकारात्मक होईल यात शंका नाही.

## शासकीय अधिकारी,कर्मचारी यांनी विकसित महाराष्ट्र सर्वेक्षणात सहभागी व्हावे-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड (सरकार)विकसित महाराष्ट्र २०४७ चे नागरिक सर्वेक्षण १७ जुलै, २०२५ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या सर्वेक्षणात सामान्य नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे, जेणेकरून त्यांच्या समस्या, शासनाकडून असलेल्या अपेक्षा याबाबत माहिती घेऊन त्यानुसार रोडमॅप तयार करणे शक्य होणार आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रथम सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी स्वतः https://wa.link/O93s9m या लिंकवर क्लिक करुन सर्वेक्षणात सहभागी व्हावे. आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना देखील सर्वेक्षणात सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.



तद्नंतर आपल्या अधिनस्त किंवा संपर्कात येणाऱ्या सर्व नागरि कांना सर्वेक्षणात सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहित करावे. आपल्या गावातील, शहरातील तसेच नातेवाईक, मित्रांच्या व्हाट्सएप ग्रुपवरुन याबाबत जागृती करावी, जेणेकरुन बीड जिल्ह्यातून जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग नोंदविणे शक्य होणार असल्याचेही जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी शासकीय यंत्रणाना सांगितले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ०६ मे २०२५ ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये विकसित महाराष्ट्र २०४७ करिता व्हिजन डॉक्यूमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

## साहित्य भारतीच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी प्रभाकर साळेगावकर तर कार्यवाहपदी डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर

बीड (सरकार): अखिल भारतीय साहित्य परिषद सलग्न साहित्य भारती देवगिरी प्रांत जिल्हा शाखा बीडच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर तर कार्यवाह म्हणून उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर सरांची निवड करण्यात आली.

अखिल भारतीय साहित्य परिषद संलग्न साहित्य भारतीचे देवगिरी प्रांत मंत्री युवराज नळे यांच्या उपस्थितीमध्ये दि. १६ जुलै रोजी बीड जिल्ह्याची साहित्य भारतीची नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. या मध्ये अध्यक्षपदी प्रभाकर साळेगावकर,



कार्यवाह - डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, मंत्री - प्रशांत भानप, मार्गदर्शक - मधुकर वैद्य, स्नेहलताई पाठक, उपाध्यक्ष - सुरेश भानप, चंद्रकन्या सारसेकर,सह मंत्री - अशोक. डॉ. अशोक घोळवे, कोष/कार्यालय प्रमुख - प्रा.अनंत देशपांडे, प्रचार प्रमुख - दत्ता आंबेकर,महिला प्रतिनिधी - मंजुषा कुलकर्णी, गौरी देशमुख, लता जोशी, डॉ.रुपाली कुलकर्णी, वाचक प्रतिनिधी - द. ल. वारे, स्मिता लिंबगावकर,युवा प्रतिनिधी - शांभवी जगदीश कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य - डॉ रमेश लांडगे, प्रा. सत्यप्रेम लगड, डॉ. श्रीमंत तोंडे, लक्ष्मण वाकडे, अशोक. दीपक देशमुख, प्रमोद कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी युवराज नळे यांच्या हस्ते सर्व नवनिर्वाचित कार्यकारणीचा सत्कार करण्यात आला.

## पेटंटमुळे समाजाला तंत्रज्ञान व उत्पादनाची उपलब्धी होते-प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे

गढी (सरकार): कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथील गृहशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ अयोध्या पवळ यांना पेटंट मिळाल्याबद्दल महाविद्यालयातील संशोधन कार्यक्रम योजना व विकास समितीच्या वतीने त्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे शुभेच्छापर बोलत असताना त्यानी असे प्रतिपादन केले, की पेटंट शोधकर्त्यांना त्यांच्या शोधांना कायदेशीर संरक्षण देऊन त्यांना फायदा देतात..पेटंटमुळे या शोधांबद्दलची तांत्रिक माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध करून देऊन आणि अशा प्रकारे नवोपक्रमाला गती देऊन समाजालाही फायदा होतो.समाजाला यामुळे नवीन तंत्रज्ञान व उत्पादन यांची उपलब्धी प्राप्त होते.प्रा.डॉ. अयोध्या पवळ यांना मिळालेल्या पेटंटमुळे महाविद्यालयाच्या संशोधन क्षेत्रातील योगदानात निश्चितच भर पडली आहे.यावेळी प्रा. डॉ. अयोध्या पवळ यांनी आपल्या मनोगतातून आपली भूमिका विशद केली. प्रा.डॉ. अयोध्या पवळ यांच्यासह प्रा. डॉ. चेतना डोंगलीकर, प्रा. डॉ. उषा माने व प्रा. डॉ. रोहिणी अंकुश यांना संयुक्तारित्या Compositions and Methods for an Immunity: Boosting Spice Powder' या विषयावरील संशोधनासाठी शासनाचे पेटंट मिळाले आहे.त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापकांनी त्यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ धर्मराज कटके, सूत्रसंचालन प्रा. डॉ राणी जाधव व आभारप्रदर्शन प्रा. हिरा पोटकुले यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्रध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## जायकवाडीतून माजलगाव धरणासाठी पाणी सुटले,शेतकऱ्यांना दिलासा

### आ.विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

गेवराई (सरकार): पावसाने दडी मारल्यामुळे खरीपाचे पिके धोक्यात आली आहेत. पुरेसा पाऊस नसल्याने जमीनीचा ओलावा कमी होत आहे. ऊस, कापूस, सोयाबीन यांसारख्या नगदी पिकांची वाढ खुंटली आहे. दुबार पेरणीच्या संकटामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले दिसते. जायकवाडी धरणाच्या कालव्यातील पाण्याच्या नियोजना संदर्भात मंगळवार, दि.१५ जुलै रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे महत्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत गेवराईचे आ. विजयसिंह पंडित यांनी कालव्यातून सिंचनासह माजलगाव धरणासाठी पाणी सोडण्याची मागणी केली होती. मंत्री महोदयांनी ही मागणी मान्य करून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार बुधवार, दि.१६ जुलै रोजी दुपारी ४ वाजता जायकवाडी जलाशयातून माजलगाव धरणासह सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



पावसाने दडी मारल्यामुळे खरीपाची पिके धोक्यात आली आहेत. खरीप पिकांसाठी पावसाची मोठी गरज असताना त्यात खंड पडल्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. ऊस, कापूस, सोयाबीन, मुग, उडीद यांसारख्या पिकांच्या पेरणीसह मशागतीवर मोठा खर्च करून दुबार पेरणीचे संकट निर्माण होते की काय ? असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. जायकवाडी धरण व कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी किमान धरणातील पाणी कालव्यात सोडून सिंचनाची व्यवस्था करण्याची मागणी वारंवार केली होती. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आ. विजयसिंह पंडित यांनी ही बाब राज्याच्या जलसंपदा मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. मंगळवार, दि.१५ जुलै रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जायकवाडी धरणाच्या कालव्यातील पाण्याच्या नियोजनासाठी बैठकीचे आयोजन विधानभवन येथे केले होते.

या बैठकीत गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांनी जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून माजलगाव धरण आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी सोडण्याची विनंती केली होती. या बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी सुध्दा अशा प्रकारची मागणी लावून धरली. त्यांच्या मागणीची दखल घेऊन कालव्यात पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. बुधवार, दि.१६ जुलै रोजी दुपारी ४ वाजता जायकवाडी जलाशयातून माजलगाव धरणासह सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून काही प्रमाणात त्यांच्या पिकांना जीवनदान मिळणार आहे. यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

## ज्येष्ठ नागरीकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

बीड (सरकार): अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा,बीड आणि सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालय,नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जुलै २०२५ रोजी ज्येष्ठ नागरीकांसाठी संधीकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात करण्यात आले आहे.ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, त्यांना जे छंद तरूण वयात असताना जोपासता आले नाहीत त्यासाठी एक रंगमंच उपलब्ध करून देण्याच्या हेतूने अध्यक्ष अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद,शाखा बीड तथा नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर सचिव नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगण यांच्या हस्ते होणार आहे. त्यामध्ये गीतगायन,नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टॅंडअप कॉमेडी इ.सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. तरी सदरील कार्यक्रमासाठी बीड शहरातील सर्व रसिक श्रोते कलावंतांनी सहभाग घ्यावा व उपस्थित असे आवाहन अध्यक्ष मराठी नाट्य परिषद बीड तथा नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर आणि प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,डॉ.संजय पाटील देवळाणकर,डॉ.दुष्यंता रामटेके यांनी केले आहे.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानची सचिवपदाची सूत्रे महंत तुकाराम महाराज भारती यांच्या हाती

बीड (सरकार):तालुक्यातील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगावची सचिव पदाची सूत्रे महंत तुकाराम महाराज भारती यांच्या हाती सोपवण्यात आले आहेत. त्यांची निवड व अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून संस्थांवर भव्य किर्तन सोहळा संपन्न झाला. सुप्रसिद्ध कीर्तनकार एकनाथ महाराज गाडे यांचे सुंदर किर्तन झाले या कार्यक्रमाला महंत महादेवानंद भारती महाराज,श्री ह भ प महंत प्रकाश महाराज बोधले, श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प महंत जनार्दन महाराज शिंदे, श्री महामंडलेश्वर १००८ स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी, वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे बापू , महंत धर्मराज महाराज सामनगावकर, ताल मार्तंड केशव महाराज जगदाळे गुरुजी,श्री ह भ प भक्तीदास महाराज शिंदे,भागवताचार्य प्रेमानंद महाराज नगरकर , श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प नवनाथ महाराज नाईकवाडे, श्री ह भ प अंगद महाराज सातपुते, रंजीत महाराज



शिंदे यांच्यासह महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार गायक वादक मंडळी व हजारो भाविक उपस्थित होते..

लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे महान तपोनिधी साधू श्री १००८ ईश्वर भारती महाराज यांच्या परंपरेचे रत्न महंत तुकाराम महाराज भारती यांच्याकडे संस्थांच्या सचिव पदाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील सर्व भाविक मंडळी उपस्थित होते. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार एकनाथ महाराज गाडे यांचे सुश्राव्य हरिकीर्तन संपन्न झाले, त्यानंतर अभिष्टचिंतन सोहळ्याला सुरुवात झाली, सुरुवातीला पेढे तुला करण्यात आली, त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महंत तुकाराम महाराज भारती यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भव्य सत्कार करण्यात आला, यावेळी महादेवानंद भारती यांचाही सत्कार करण्यात आला.

## संत श्रेष्ठ सावता महाराज समाधी महोत्सव आजपासून सुरू

परळी (सरकार) येथील श्री संत सावता महाराज मंदिरात प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी १७ ते २४ जुलै दरम्यान श्री संत श्रेष्ठ शिरोमण सावता महाराज समाधी महोत्सव व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ खंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून या सात दिवस चालणाऱ्या सप्ताहात महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार गायक व मृदंग वादक तसेच भारूड असे विविध धार्मिक कार्यक्रमा सोबतच कलावंत आपली कला भारुडाच्या माध्यमातून सादर करणार असून या निमित्त रक्तदान तसेच यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार आधी सामाजिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सप्ताहातील कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री संत श्रेष्ठ सावता माळी सेवा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

परळी शहरातील जुने गावभागात असलेल्या संतश्रेष्ठ सावता महाराज मंदिरात प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी १७ ते २४ जुलै दरम्यान संतश्रेष्ठ सावता महाराज पुण्यतिथी समाधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या निमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार यांचे दररोज सायंकाळी ७ ते ९ हरिकीर्तन आयोजित करण्यात आले असून सप्ताहाच्या पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा ह भ प वेदांताचार्य शिरसागर महाराज उखळीकर तर दिनांक १८ जुलै रोजी ह भ प भागवताचार्य डॉक्टर विठ्ठल महाराज वासुदेव चौरे पंढरपूर, दिनांक १९ जुलै रोजी ह भ प भागवताचार्य तुकाराम महाराज मुंडे शास्त्री टोकवाडी दिनांक २० जुलै रोजी ह भ प भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज उखळीकर परळी २१ जुलै रोजी ह भ प वेदांताचार्य जगन्नाथ महाराज देशमुख श्रीक्षेत्र पंढरपूर दिनांक २२ जुलै रोजी ह भ प राष्ट्रीय कीर्तनकार रामकृष्ण महाराज रंधवे बापू पाटोदा २३ जुलै रोजी ह भ प प्राचार्य योगीराज महाराज गोसावी श्रीक्षेत्र पैठण २४ जुलै रोजी ह भ प भागवताचार्य विठ्ठल महाराज उखळीकर यांचे सकाळी दहा ते बारा यादरम्यान काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर गुरुवार दिनांक २४ रोजी दुपारी परळी शहरातून भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे त्यानंतर सायंकाळी पाच नंतर महाप्रसादाचे आयोजन श्री संत सावता महाराज मंदिर येथे करण्यात आले आहे दरम्यान सात दिवस चालणाऱ्या या सप्ताहात महाराष्ट्रातील कीर्तनकार टाळ मृदंग तसेच गायनाचार्य व भारुड कर असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सप्ताहातील विविध कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत श्रेष्ठ सावता माळी सेवा समाज परळी वैजनाथ यांच्यावतीने करण्यात आले आहे.

**टी.सी.हरवला आहे**

भैय्या जगन्नाथ धन्वे या नावाचा इयत्ता १२ वी पासचा टी.सी. वडवणी ते बीड प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

-:संपर्क :-

मो.९३७०२१७४१७

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९

(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779

(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)